क्रमांक : डब्ल्यूक्यूएम - २०१६/ प्र. क्र. ९१/ पापु - १२

राजेश कुमार, भा.प्र.से.
प्रधान सचिव

सत्यमेव जयते

पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

दिनांक : ०४/०८/२०१६

मा.कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे
मा.कुलगुरू, मुंबई विद्यापीठ,मुंबई
मा.कुलगुरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
मा. कुलगुरू, संत तुकडोजी महाराज विद्यापीठ,नागपूर
मा. कुलगुरू, संत गाडगे महाराज विद्यापीठ, अमरावती
मा. कुलगुरू, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
मा. कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
मा. कुलगुरू, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
मा. कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, चंद्रपूर
मा. कुलगुरू, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
मा. कुलगुरू, भारती विद्यापीठ, पुणे
मा. कुलगुरू, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पुणे

विषय : पदवी (रसायनशास्त्र) / पदव्युत्तर (रसायनशास्त्र) च्या शेवटच्या वर्षातील विद्यार्थ्यांना तात्पुरत्या स्वरुपात जिल्हा व उपविभागीय प्रयोगशाळेत पाणी तपासणीसाठी उपयोग करून घेणेबाबत.

संदर्भ : सहसचिव, पेयजल व स्वच्छता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. D.O.W.११०१९/१/२०१६-WQ Dated: २८/०६/२०१६.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयीच्या संदर्भीय पत्राच्या अनुषगांने, आपणास कळविण्यात येते कि, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या अधिनस्त असलेल्या भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमार्फत राज्यातील पाणी गुणवत्ता सनियंत्रणाचे काम करण्यात येत आहे. सदर यंत्रणेच्या विभागीय, जिल्हा व उपविभागीय स्तरावर पिण्याचे पाणी नमुने तपासणीच्या प्रयोगशाळा कार्यरत आहेत.

वरील संदर्भीय पत्रानुसार, पावसाळ्यापूर्वी, पावसाळ्यामध्ये व पावसाळ्यानंतर या तिन्ही कालावधीत पाणी नमुने वेळेत तपासले जावेत या अनुषंगाने पदवी (रसायनशास्त्र)/ पदव्युत्तर (रसायनशास्त्र) च्या शेवटच्या वर्षातील विद्यार्थ्यांना तात्पुरत्या स्वरुपात काही महिन्याच्या कालावधीसाठी विना मानधन जिल्हा व उपविभागीय प्रयोगशाळेत पाणी तपासणीसाठी उपयोगात आणण्याबाबत केद्र शासनामार्फत कळविण्यात आले आहेत.

D:\WQ\युनिक कोड पापु-१२\प्रयोगशाळा\प्रयोगशाळा बळकटीकरण\प्र.क्र.९१-२०१६नियुक्त करावयाचे मनुष्यबळ २०१४.docx